पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

३ रा मजला, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे- ४११००१

पीबीएक्स- ०२०-२६१२६६२८/२६१२६७८५/२६११४०६४ फॅक्स- ०२०-२६१२७००४/२६१३२४०१

Email :- dirmktms@gmail.com website :- www.mahapanan.maharashtra.gov.in

जा.क्र.पणन-५/कृउबास/ई-नाम/एमएसीपी/कर्म.नि./१९ /२३६० दिनांक :- ०८ जुलै,२०१९

प्रति,

सभापती/ सचिव,

कृषि उत्पन्न बाजार समिती,

(ई-नाम योजनेतील ६० बाजार समित्या) व

(एमएसीपी योजनेतील २५ बाजार समित्या)

जिल्हा-

विषय :- ई-नाम कामकाजासाठी ६० कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये पुरेशा मनुष्यबळाची नियुक्ती करण्याबाबत...

संदर्भ :- १. या कार्यालयाकडील पत्र जा.क्र.कृउबास/ई-नाम योजना/कम-नि/२४८३/२०१८,दि.२७.०६.२०१८ व दि.२२.०१.२०१८

२. महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांचे दि.०४.०४.२०१९ चे पत्र.

उपरोक्त विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

२. ई- नाम व एमसीपी योजनेतील कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये पुरेशा मनुष्यबळाची नियुक्ती या कार्यालयाचे संदर्भीय पत्रान्वये आवश्यकतेनुसार बाजार समित्यांनी ६ महिने कालावधीसाठी एकूण १० कर्मचाऱ्यांची पदनिहाय जसे की, गेट एन्ट्री, आऊट गेट एन्ट्री या कामकाजासाठी आस्तित्वातील कर्मचारी यांचे आदेश काढावे आणि, शेतमाल गुणवत्ता तपासणी, ऑक्शन हॉल व मंडी ॲनालिस्ट इ. कामकाजासाठी शैक्षणिक अर्हताधारक यांची महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनिमयन) नियम, १९६७ चे नियम १००(५) अन्वये पूर्णपणे कंत्राटी स्वरूपात विहित पध्दतीने मानधनावर नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

३. ई-नाम व एमसीपी योजनेतील कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांनी कामकाजासंदर्भात घेतलेल्या आढाव्यात ई- नाम व एमसीपी योजनेतील समाविष्ट बाजार समित्यांचे प्रतिनिधी यांनी ज्या बाजार समित्यांनी कंत्राटी कर्मचारी यांची नियुक्ती केलेली आहे त्या कर्मचाऱ्यांना कामकाजाचा अनुभव लक्षात घेता त्यांना मुदतवाढ देणेबाबतचा मुद्दा उपस्थित केलेला होता. याअनुषंगाने सदरील कर्मचाऱ्यांना कालमर्यादा न घालता परवानगी दिल्यास ई-नाम व एमसीपी योजनेमधील कामकाजात सातत्य राहून योजनेची प्रगती होण्यास मदत होईल असे महाराष्ट्र राज्य कृषि पणन मडळ, पुणे यांनी संदर्भीय पत्रान्वये कळविलेले आहे.

सबब, याद्वारे कळविण्यात येते की, ई-नाम व एमसीपी योजनेत समाविष्ट असणाऱ्या कृषि उत्पन्न बाजार समित्यांनी त्यांचे स्तरावरून या कार्यालयाचे संदर्भीय पत्र क्र. १ नुसार शेतमाल गुणवत्ता तपासणी, ऑक्शन हॉल व मंडी ॲनालिस्ट कामकाजासाठी आवश्यकता असेपर्यंत व कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत शासनाच्या प्रचलित धोरणाच्या अधिन राहून कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळाची नियुक्ती करण्याबाबत या कार्यालयाशी हरकत नाही.

(डॉ. किशोर तोष्णिवाल)
पणन संचालक,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर :-

मा. प्रधान सचिव (पणन) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२.

प्रत माहितीसाठी :-

१. मा. प्रकल्प संचालक, महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे-३७.

२. मा. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे-३७.

३. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व) ४. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)